वाचले:- १) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, यांचेकडील दि.२३ मे २०१८ रोजीची अधिसुचना.
२) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, यांचेकडील दि.१८ फेब्रुवारी २०२० रोजीची अधिसुचना.
३) नगरविकास विभाग शासन आदेश क्र.पीसीसी-२०२१/प्रक्र..३२०/नवि-२२ दि. २० ऑक्टोबर २०२२
४) वित्त विभाग शासन निर्णय क्र.सेवाप्र-१०९९/प्र.क्र.७७/कोषा-३अ दि. ०१ एप्रिल २०००
५) मा.महापालिका सभा ठराव क्र.६१७ दि.०९/०७/२०२४
६) मा.आयुक्त सो यांचा दि.१९/०७/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८
क्र.लेखा/आस्था१/कावि/९५१/२०२४
दिनांक :-१९/०७/२०२४

विषय:- ''मुख्य लेखा व वित्त अधिकारी'' या पदाचे पदनाम मराठी भाषेमध्ये - **''मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक ( वित्त ) व इंग्रजी भाषेमध्ये – '' Chief Accounts and Finance Officer cum Director ( Finance)''** असे बदलणेबाबत''

आदेश,

संदर्भ क्र.१ च्या अधिसुचनेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मुख्य लेखा अधिकारी हे पद शासनाच्या वित्त व लेखा सेवेतील सह संचालक संवर्गासाठी अधिसुचीत केलेले आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पदांचा आकृतीबंध मंजूर झालेला असून त्यामध्ये मनपाचे वित्त व लेखा शाखा/ विभागप्रमुखांचे पदनाम मुख्य लेखा व वित्त अधिकारी असे नमूद करण्यात आलेले आहे.

संदर्भ क्र.३ अन्वये वित्त विभागाच्या शासन आदेशान्वये मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे पद महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील **''संचालक''** संवर्गात ७ व्या वेतन आयोगानुसार पे मेट्रीक्स मधील वेतन स्तर एस-२९ मध्ये ( वेतनश्रेणी १३११००-२१६६००) श्रेणीवाढ करण्यात आलेले आहे.

संदर्भ क्र.४ च्या शासन आदेशान्वये वित्त विभागाने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील विविध संवर्गासाठी सुधारीत पदनामे विहीत केलेली आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद २ मध्ये संचालक संवर्गासाठी सुधारीत पदनाम **संचालक** असे करण्यात आलेले असून परिच्छेत ४ मध्ये नमूद केले आहे की एखाद्या कार्यालयास सुधारित पदनाम करणे गैरसोयीचे होणार असेल अशा विभागांनी सुधारीत पदनामाच्या पुढे कंसात संबंधीत पदाच्या कर्तव्यानुसार उपनाम द्यावे असे आदेशीत केले आहे.

सबब, मी आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका या आदेशान्वये उपरोक्त तरतूदीस अनुसरून पिं.चि.म.न.पा आस्थापनेवर मंजूर ''मुख्य लेखा व वित्त अधिकारी'' या पदाचे पदनाम मराठी भाषेमध्ये - **''मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक ( वित्त ) व इंग्रजी भाषेमध्ये – '' Chief Accounts and Finance Officer cum Director ( Finance)''** असे करण्यास मान्यता देत आहे. पदनामात बदल केल्यामुळे या पदाच्या विद्यमान वेतनश्रेणी / कर्तव्ये आणि जबाबदा-या यामध्ये कोणताही बदल होणार नाही. प्रस्तुतचा बदल करण्यात आलेल्या पदनामाच्या नोंदी मनपा दप्तरी आवश्यक त्या ठिकाणी घेण्यात याव्यात व या आदेशान्वये मनपाचे सर्व संबंधित विभागांनी कार्यालयीन कामकाजात त्याप्रमाणे वापर करावा व यापुढे पद चालू ठेवताना सुधारीत पदनामाने चालू ठेवण्यात यावे.

( शेखर सिंह )
आयुक्त तथा प्रशासक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी

प्रत:- १) सामान्य प्रशासन विभाग  २) लेखा विभाग  ३) मुख्य लेखापरिक्षण विभाग  ४) सर्व संबंधित विभाग